ARTHA
(Fortnightly)
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 173

वर्ष १८ | पुणे, बुधवार, २० सप्टेंबर, १९७१ | अंक १८

## तुमच्या मुलीचे लग्न ही काही बाहुला बाहुलीच्या लग्नाइतकी सोपी गोष्ट नाही...



## पण आमच्या आवर्तक ठेव योजनेमुळे ती सोपी होते...

तुमच्या मुलीच्या लग्नासाठी आवश्यक तेवढा पैसा आमच्या ह्या आवर्तक ठेव योजनेमुळे खात्रीने उपलब्ध होतो. दर महिन्याला ठराविक रकमेची बचत करा. तुमची बचत सतत वाढतच जाईल आणि ज्या वेळी तो मंगल दिवस उगवेल त्यावेळी तुम्हाला जाणवेल ... आपण किती सुखी आहात ... पैशाची तर चिंताच नाही.

दर महिन्याला बँकेत ठेवायची रक्कम रु. ५ किंवा त्याच्या पटीत
मुदत : १ ते १० वर्षे
व्याज : ७ टक्क्यांपर्यंत

अधिक तपशीलासाठी आमच्या कोणत्याही शाखेला भेट द्या.

**बँक ऑफ महाराष्ट्र**
हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २

# विविध माहिती

**माजी संस्थानिकांना हत्यारांचे परवाने** — घटनेपूर्वी माजी संस्थानिकांना हत्यारे बाळगण्यासाठी सरकारी लायसेन्स लागत नसे. आता त्यांनी तीन महिन्यांच्या आत परवाने घतले पाहिजेत किंवा हत्यारे परत केली पाहिजेत. प्रत्येकाला जास्तीत जास्त तीन हत्यारे बाळगता येतील—रायफल, गन आणि रिव्हॉल्व्हर किंवा पिस्तुल.

**मिशनऱ्यांच्या घरांवर छापा** — आसाममधील सीमेवर बारंग जिल्ह्यातील काही मिशनऱ्यांच्या घरांवर छापे घालून शक्तिशाली ध्वनिक्षेपक उपकरणे, टेप रेकॉर्डर्स आणि इतर मौल्यवान विदेशी माल जप्त केला. हे मिशनरी सीआयएचे हस्तक असून अरुणाचल टोळीवाल्यांना फुटीर बनण्यास चिथावणी देत आहेत, असा त्या मिशनऱ्यांवर आरोप करण्यात आलेला आहे.

**राजाजींचे महाभारत**—श्री. सी. राजगोपालचारींचे महाभारतावरील पुस्तक पाच अमेरिकन विद्यापीठांत पाठ्यपुस्तक म्हणून लावण्यात आले आहे. त्या पुस्तकाच्या आजवर १० आवृत्त्या होऊन २,२०,००० प्रती खपल्या आहेत.

**एका इमारतीचे दोन कोनशिला समारंभ** — धारवाडजवळील ब्याहट्टी खेडेगावातील एका शाळेच्या इमारतीचा कोनशिला समारंभ ८ सप्टेंबर रोजी म्हैसूरचे मुख्य मंत्री श्री. देवराज उर्स ह्यांच्या हस्ते पार पडला. समारंभानंतर मुख्य मंत्र्यांनी इमारतीच्या देणगीदाराला पुष्पहार घातला, तेव्हा तो देणगीदार म्हणाला, "१९६० सालीच तेव्हाचे मुख्य मंत्री श्री. जत्ती ह्यांच्या हस्ते कोनशिला बसविण्यात आली होती. ह्या दुसऱ्या समारंभानंतर तरी इमारत उभारली जाईल अशी मी आशा करतो." मुख्य मंत्र्यांना १२ वर्षांपूर्वीच्या समारंभाचे प्रत्यक्ष फोटोच दाखविण्यात आले.

**प्रत्येक ४३ लोकांत एकाजवळ रेडिओ** — प्रत्येक ४३ लोकांत एकाजवळ मालकीचा रेडिओ असतो, असे १९७१ मध्ये आढळून आले. १९५१ मध्ये ५२७ लोकांत एकाजवळ रेडिओ होता, तर १९६१ मध्ये १६९ लोकांत एकाजवळ रेडिओ होता. १९४७ साली १,७५,९५५ रेडिओ लायसेन्स दिलेले होते, त्यांची संख्या गेल्या वर्षी १,२७,५२,२९७ एवढी झाली.

**एक कोटी, सात लक्ष जन्म टळले** — कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमास प्रारंभ झाल्यापासून ३० जून १९७२ अखेर १ कोटी, ७ लक्ष जन्म टळले आहेत. त्यामुळे जननाचे दर हजारी प्रमाण ३७·१ झाले आहे.

**कामाच्या दुबार वेळा**— मुंबई आणि ठाणे जिल्ह्यातील बँकांच्या शाखांच्या शिफ्ट कामाच्या वेळा रद्द करण्याची आणि रविवारच्या कामाच्या वेळाही रद्द करण्याची शहानिशा इंडियन बँक्स असोसिएशन करीत आहे.

**वक्तशीरपणाचा अभाव भोवला** — मेलबर्न येथील 'क्वीन ऑफ दि पसिफिक' स्वरूप सुंदरी स्पर्धेतील यशस्वी स्पर्धक हवाईची मिस बँगलॉस हिने मुंबईत सांगितले की स्पर्धेमध्ये सौंदर्याबरोबर वागण्याची पद्धत, मोहकता, प्रसंगावधान, इत्यादींचाही विचार केला गेला. भारताची कु. प्रेम नारायण हिची निवड न होण्याचे मुख्य कारण ती नेहमीच उशीर करून यावयाची.

**पंतप्रधानांनी हवाई खात्याचे देणे**— "पंतप्रधानांनी निवडणुकांचे वेळी १३ फेब्रुवारी ते ९ मार्च, १९७२ ह्या मुदतीत हवाईदलाच्या विमानांचा, हेलिकॉप्टरांचा व संरक्षण खात्याच्या वाहनांचा उपयोग केला, त्यांच्या बिलांची रक्कम ४,९७,००० रुपये झाली. त्यापैकी २,८९,५६८ रुपये जमा झाले असून बाकी येण्याच्या वसुलीची व्यवस्था करण्यात येत आहे." असे संरक्षणमंत्र्यांनी लोकसभेत सांगितले.

**रेल्वे स्टेशनात बँक कचेऱ्या**— रेल्वे स्टेशनांतून बँकिंगच्या सोई उपलब्ध करून देण्यासाठी एक योजना आखण्यात आली आहे. प्रथम प्रमुख रेल्वे स्टेशनांतून राष्ट्रीयीकृत बँकांच्या ५० कचेऱ्या उघडण्यात येतील.

**ट्रॅक्टर्सला मागणी मंदावली**— १९४६ मध्ये सबंध भारतात फक्त ४,५२४ ट्रॅक्टर्स होते. गेल्या २५ वर्षांत त्यांची संख्या २२ पट झाली आहे; म्हणजे आता १ लक्षापेक्षा जास्त ट्रॅक्टर्स आहेत. वाढती किंमत, बँकांकडून होणाऱ्या कर्जपुरवठ्याची मंद गती आणि जमिनीच्या क्षेत्राच्या मालकीवरील नियंत्रण, ह्यांमुळे हिंदी ट्रॅक्टर्सना मागणी मंदावली आहे.

**सर्वोत्कृष्ट वार्षिक अहवालाला चांदीची ढाल**— ३१ मार्च, १९७१ अखेरच्या वर्षाचा सर्वोत्कृष्ट वार्षिक अहवाल आणि ताळेबंद ह्याबद्दल इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटसची चांदीची ढाल टाटा इंजिनिअरिंग अँड लोकोमोटिव्ह ( टेल्को ) कंपनीला मिळाली आहे.

**हाज उतारूंसाठी ३ कोटी रु. ची परदेशी हुंडणावळ**— हाज उतारूंच्यासाठी १९७३ च्या मोसमात ३ कोटी रु. ची परदेशी हुंडणावळ उपलब्ध करून देण्याचे सरकारने ठरविले आहे. त्यामुळे १,००० उतारूंना विमानाने आणि १४,००० उतारूंना समुद्रमार्गे जाता येईल. विमानांच्या उतारूंना १,५७५ रु. ची आणि आगबोटींच्या उतारूंना २,००० रु. ची परदेशी हुंडणावळ मिळेल.

**साखरेच्या उत्पादनात प्रचंड घट**— १९७१–७२ च्या पहिल्या दहा महिन्यांत ३०,६७,००० टन साखरेचे उत्पादन झाले; १९७०–७१ च्या तत्सम मुदतीत ते ३७,१२,००० टन भरले होते. म्हणजे, उत्पादनात ७,४५,००० टनांची घट झाली. ( साखरेचे वर्ष ऑक्टोबर ते सप्टेंबर असते. ) जुलै १९७२ मध्ये म्हणजे दहाव्या महिन्यात साखरेचे काहीच उत्पादन झाले नाही; जुलै, १९७१ मध्ये ते २१,००० टन झाले होते.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, २० सप्टेंबर, १९७२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## पाण्याअभावी पडणाऱ्या दुष्काळाला तोंड देता येईल

इंडिअन अग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर श्री. ए. बी. जोशी ह्यांनी एका मुलाखतीत पावसाच्या लहरीमुळे कोसळणाऱ्या दुष्काळाला यशस्वीरीत्या तोंड देता येईल; मात्र त्यासाठी आधुनिक पद्धती वापरण्यात आल्या पाहिजेत असा अभिप्राय व्यक्त केला आहे. ते म्हणतात की ह्या नव्या पद्धती रशिआ व काही इतर प्रगत देश ह्यांतून वापरण्यातही येत आहेत. उपलब्ध पाण्याची साठवण हा एक उपाय असून रशिआतील जिराईत शेतीत त्याचा उपयोग करण्यात येत आहे. तेथे पावसाचे पाणी वाहात जाऊ न देता जमिनीत मुरावे म्हणून चर खणण्यात येतात. चरातून साठलेले पाणी जमिनीच्या खालच्या थरात मुरते. ही एक प्रकारे पाण्याची साठवणच आहे. कारण त्यामुळे जमिनी-खालील पाण्याची पातळी वाढते आणि वरच्या थरात ओलावा टिकून राहतो. पुणे नगरपालिकेचे माजी मुख्याधिकारी श्री. एस. आर. भागवत ह्यांनी अशा प्रकारचे प्रयत्न पुण्याजवळील एका डोंगराळ भागात केले होते आणि त्यांना यशही आलेले होते. श्री. भागवत पाण्याची जोपासना करण्यासंबंधी कटाक्षाने बोलत असत. त्यांच्या म्हणण्यातील सत्य अशा रीतीने सिद्ध झाले. रशिआत पाणी साठविण्यासाठी आणखीही एक पद्धत वापरण्यात येते. ती म्हणजे ठिकठिकाणी शेतातच लहान लहान तळी खोदणे. ह्या पाण्याचा उपयोग पावसाअभावी पाण्याची टंचाई भासू लागताच सहज करता येतो. तिसरी पद्धत नत्रयुक्त खताने दुष्काळाला तोंड देण्याची आहे. ह्या पद्धतीत पेरणी होण्यापूर्वी जमिनीत नत्रयुक्त खताचे मिश्रण गाडण्यात येते. ह्या पद्धतीने पिके तर सकस येतातच; पण अवर्षणाला तोंड देण्याची त्यांची ताकदही वाढते.

तथापि, विवक्षित भागांतील दुष्काळाला तोंड देण्याचे उपाय सुचविण्यापूर्वी तेथील भूमिगत पाण्याच्या साठ्याची पाहणी करण्यात आली पाहिजे. भारतात आणखी एक उपाययोजना करता येण्यासारखी आहे. ती म्हणजे वापरलेले पाणीच पुन्हा वापरणे. शेतकरी पिकासाठी जितके पाणी वापरतो त्याच्या एकतृतीयांश पाणीच खरे म्हणजे पुरेसे असते. बाकीचे पाणी वाया जाते. हे पाणी यंत्राच्या साह्याने खेचून पुन्हा वापरता येणे शक्य आहे. स्थानिक भौतिक परिस्थितीप्रमाणे पाणी जपून व काटकसरीने वापरण्याचे उपाय योजता येण्यासारखे आहेत. राजस्थानात पिण्याचे पाणी टाक्यांतून साठविण्यात येते. अर्थात सूर्यकिरण तेथे पोहचणार नाहीत अशी दक्षता घेण्यात येते. हे पाणी माणसाने वापरण्यास योग्य अशा स्वरूपात टिकते. ज्या भागात पावसाळ्यात भरपूर पाऊस पडत असूनही उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी ओरड होते, तेथील लोकांनी हा उपाय अमलात आणून पाहाण्यासारखा आहे. नलिकाकूप खोदणे हाही एक उपाय आहे. परंतु तो मोठ्या प्रमाणावर वापरता येण्यासारखा नाही. कारण, अशा विहिरीतून पाणी खूप खेचले गेल्यास भूमिगत पाण्याच्या हालचालीत अनपेक्षित बदल घडून येण्याची शक्यता असते. हवामान शास्त्राची प्रगती अद्याप शेतकऱ्याला अवर्षणाला तोंड देण्यास मदत करण्यास साह्य देण्याइतकी झालेली नाही.

---

## बांगला देशातील बँकिंग

१९७१ मधील लुटालूट, चलनी नोटांची जाळपोळ, सोने व इतर जिंदगीचे पाकिस्तानात स्थलांतर, ही लक्षात घेता बांगला देशाच्या बँकिंगने आपले बस्तान अल्पावधीत बरेच बसविले आहे असे म्हटले पाहिजे. बांगला देशाला जुलै १९७२ ते जून १९७३ ह्या मुदतीत ३७५ कोटी रु. चे परदेशी चलन मालाच्या निर्गतीमुळे मिळेल. भारत, रशिआ, पूर्व युरोपीय देश, जपान, ग्रेटब्रिटन, अमेरिका, इत्यादींनी मोठ्या रकमा कर्जाऊ आणि देणगीदाखल देऊ केल्या आहेत. इंटर नॅशनल मोनेटरी फंडाने बांगला देशाला सभासद करून घेतले आहे आणि जागतिक बँकेने कर्जे देण्यास प्रारंभ केला आहे. दर माणशी परदेशी चलनाची प्राप्ती विचारात घेतली, तर भारतापेक्षा बांगला देशाची प्राप्ती ५०% जास्त भरेल. तेथील सर्व बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आलेले आहे. केंद्रस्थानी बांगला देश बँक असून नंतर सहा बँका येतात—सोनाली बँक, रूपाली बँक, पुबाली बँक, अग्रणी बँक, जनता बँक आणि उत्तर बँक. त्यांनी कुणी अद्याप परदेशात शाखा उघडलेली नाही. परंतु ग्रेटब्रिटनमधील बांगला देशाच्या नागरिकांनी तेथे एक बँक उघडली आहे. काही विदेशी बँका बांगला देशात चालू आहेत, त्या सर्व बांगला देश बँकेच्या नियंत्रणाखाली चालतात. बांगला देशातील बँकांना दीर्घ मुदतीच्या ठेवी अद्याप फारशा मिळू लागलेल्या नाहीत, त्यामुळे त्यांना दीर्घ मुदतीची कर्जे देणेही कठीण जाते. ढाका स्टॉक एक्सचेंजवर शेअर्स व रोखे ह्यांची खरेदी–विक्री अद्याप सुरू झालेली नाही. बांगला देशाच्या पुनर्घटित बँकिंगला आर्थिक अभ्युदयाची फार मोठी कामगिरी बजवायची आहे.

### नगररचना हिंदी तज्ज्ञांनीच केली पाहिजे

संयुक्त राष्ट्र संघटनेतील प्रादेशिक योजना विभागविषयक तज्ज्ञ प्रो. झारेंबा भारताच्या दौऱ्यावर आले होते. भारतामधील नगररचनेच्या प्रश्नाविषयी पत्रपंडितांशी बोलताना ते म्हणाले की भारतामधील नगररचनेचे कामं परदेशीय तज्ज्ञांकडून करवून न घेता ते हिंदी तज्ज्ञांनीच केले पाहिजे. एखादा कारखाना परदेशातून विकत घेता येईल. पण नगररचनेचे काम ज्याचे त्यानेच केले पाहिजे. कारण नगररचनेचे काम आणि आर्थिक नियोजन ह्यांचा मेळ घालावा लागतो. भारतामधील कोणतेही शहर अत्युत्कृष्ट रीतीने रचण्यात आले आहे असे म्हणता येणार नाही. आर्थिक नियोजन हे प्रादेशिक विभागापासून सुरू झाले पाहिजे. मोठी गावे अगर शहरे ह्यांपासून त्याला सुरुवात होता कामा नये. भारतामधील शहरांची वाढ आता थांबविण्यात आली पाहिजे. मुंबई शहर आजच अतिशय दाटीवाटीचे झाले आहे. म्हणून पुणे–नाशिक सारख्या शहरांच्या जवळपास जुळ्या शहरांचा विकास करण्यात आला पाहिजे. त्यामुळे मुंबईकडे येणारा लोकांचा ओढा निराळ्या दिशेने जाऊ लागेल. मुंबई शहराच्या विकासाची जी योजना आखण्यात आली आहे तीमुळे हे शहर चांगल्या नगररचनेचे होऊ शकेल. मात्र योजनेची अमलबजावणी नीट झाली पाहिजे. दिल्ली शहर भारताची राजधानी असली तरी ते चांगल्या रीतीने आखण्यात आलेले नाही. तेथे आज अनेक नव्या वस्त्या उभारण्यात येत आहेत. परंतु वेगाने वाहतूक करण्याची व्यवस्था मात्र नाही. वस्त्यांना परवानगी देण्यापूर्वी वाहतुकीची व्यवस्था करावयास हवी होती.

---

### पाकिस्तानची काड्याच्या पेट्यांची आयात

पाकिस्तान टाइम्समध्ये प्रसिद्ध झालेल्या माहितीप्रमाणे पाकिस्तानला १२ महिन्यांच्या अवधीत ११ कोटी रुपये किंमतीच्या काड्याच्या पेट्यांची आयात करावी लागली. ही रक्कम अर्थातच परदेशीय चलनांत मोजावी लागली. बांगला देश फुटून निघण्यापूर्वी पाकिस्तान आपली बहुतेक गरज पूर्व पाकिस्तानातून आयात करून भागवत असे. पण, गेल्या वर्षी २५ मार्चला तेथे लष्करी दडपशाही सुरू झाली व अखेर पूर्व पाकिस्तान बांगला देश म्हणून बाहेर पडले. त्यानंतर तेथून होणारी आयात बंदच पडली. पाकिस्तान काड्याच्या पेट्यांच्या आयातीवर बंदी घालण्याचा विचार करीत आहे. पश्चिम पाकिस्तानातील काड्याच्या पेट्यांचे कारखानदारही संरक्षणाची मागणी करीत आहेत.

---

सिनेनट औषधांचे कारखानदार होणार — पश्चिम बंगालमध्ये औषधांचे कारखाने उभारण्यासाठी लायसेन्स मागणारात बरेचसे सिनेनट आहेत.


दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बँक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| आर्थिक स्थिती | १०–६–१९७१ रोजी |
|---|---|
| १. भांडवल व निधी | रु. १८८५ लाख |
| २. ठेवी | रु. ९३३१ लाख |
| ३. कर्जे | रु. १४१८९ लाख |
| ४. एकूण खेळते भांडवल | रु. १९५५१ लाख |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी विलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक

डॉ. वा. पु. भीर्भामाळ, कार्यकारी संचालक — श्री. नि. श्री. सपकाळ, एम्. ए., एलएल. बी., अध्यक्ष



तारेचा पत्ता : "मॉर्गेज" नी
दूर मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स)
ध्व कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन)
उपकार्यालय नं.१: २६०३०६ नं.२: २९०००६

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.
( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७१ अखेर बँकेचे भागभांडवल ८ कोटी ८७ लाख, गंगाजळी ६९ लाख, कर्जविमोचन निधीची गुंतवणूक ४५ कोटी व येणे कर्ज ११५·५५ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. मो. गोखले, व्यवस्थापक — जी. पी. भावे, कार्यकारी संचालक

## हिंदमधील दुसरे दूरचित्रक्षेपण केंद्र

हिंदमधील दुसऱ्या दूरचित्रवाणी केंद्राचे प्रायोगिक प्रक्षेपण मुंबई येथे यशस्वी रीतीने करण्यात आले. पुढील महिन्याच्या प्रारंभापासून केंद्राचे कार्यक्रम रीतसर सुरू होतील. ४४ वर्षांपूर्वी ज्या ठिकाणाहून ध्वनिप्रक्षेपणाचा श्रीगणेशा करण्यात आला त्याच ठिकाणी चित्रवाणीचे अत्याधुनिक केंद्र उभारण्यात आले आहे. मुंबई येथील केंद्रावरून इंग्लिश, मराठी, हिंदी आणि गुजराती भाषेतील कार्यक्रम प्रक्षेपित करण्यात येणार आहेत. प्रत्येक भाषेतील कार्यक्रम ३ तासांचा राहणार आहे. शाळेतील विद्यार्थ्यांसाठी असणारे कार्यक्रम पुढील वर्षापासून सुरू करण्यात येणार आहेत. दूरचित्रवाणी केंद्राचा मुंबई येथील प्रक्षेपक मनोरा आग्नेय आशिआतील सर्वात उंच असा आहे. फक्त टोकिओ केंद्राचा मनोरा ह्या मनोऱ्यापेक्षा ३० मीटर अधिक उंचीचा आहे. पुण्याजवळील सिंहगड ह्या इतिहासप्रसिद्ध किल्ल्यावर उभारलेल्या पुनर्प्रक्षेपक केंद्रावरून पुणेकरांना चित्रवाणीचा लाभ घेता येईल. मुंबईमधील वरळी केंद्र आणि पुणे केंद्र मिळून १६ हजार चौ. किलोमीटर भागांतील लोकांना चित्रवाणी दिसू शकेल. लोक संख्येच्या दृष्टीने ७० लाख लोक चित्रवाणीच्या कक्षेत येतील. वरळीमधील केंद्र उभारण्याच्या कामी पश्चिम जर्मनीने २ कोटी रुपयांची आधुनिक उपकरणे देणगी म्हणून दिली आहेत. शिवाय ४ हिंदी एंजिनिअरांना पश्चिम जर्मनीत शिक्षणही दिले आहे. तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी चार जर्मन तंत्रज्ञ तयार असतील. दूरचित्रवाणीच्या सेट्ससाठी मागणी वाढत चालली आहे ती पुरविण्यासाठी मुंबईचे कारखानदार सज्ज होत आहेत.

---

## गुजरातमधून कॅनडाला जाणाऱ्यांची गर्दी

गुजरात राज्यातून नोकरीसाठी कॅनडाला जाणाऱ्या लोकांची गर्दी गेल्या काही दिवसांत बरीच वाढली आहे. बलसाड व सुरत जिल्ह्यांतील लोकांचा त्यात विशेष भरणा आहे. गेल्या महिन्यात कॅनडाला जाण्यासाठी १,८०० लोकांनी पासपोर्टसाठी अर्ज केले होते. अजूनही कॅनडाला जाऊ इच्छिणाऱ्या लोकांची गर्दी कमी झालेली नाही. विमान कंपन्यांचे एजंट असे सांगत आहेत की कॅनडात नोकऱ्यांचा तुटवडा नाही. म्हणून ज्यांना परदेशी नोकऱ्या हव्या आहेत त्यांनी त्वरा करावी असा प्रचार करण्यात येत आहे. ह्या महिनाअखेर कॅनडाचे सरकार परदेशांतून येणाऱ्या नागरिकांसाठी सध्याचे सैल धोरण अमलात आणील; पण त्यानंतर मात्र ह्या धोरणात बदल करण्यात येणार असल्याच्या वार्ता पसरल्या आहेत. विमान कंपन्यांच्या एजंटांच्या माहितीप्रमाणे भारतामधून कॅनडाला थेट जाणाऱ्या हिंदी नागरिकांना प्रवेश परवाना लागत नाही. कॅनडात तीन महिने अशा परवान्यावाचूनही राहता येते. एवढ्या अवधीत तेथे नोकरी मिळवून स्थायिक होता येते. तथापि ह्याच वेळी कॅनडात नोकरीच्या शोधासाठी गेलेले काही लोक परतही येत आहेत. नोकरी मिळण्याच्या बाबतीत त्यांची निराशा झालेली आहे. परंतु त्यांच्या अनुभवाचा तेथे नव्याने जाऊ इच्छिणारांवर फारसा परिणाम होत नाही. काहीजण सर्व परिस्थिती लक्षात घेऊन दैवावर हवाला टाकून कॅनडाला जात आहेत. त्याचे कारण कॅनडाला जाण्यास फार मोठा प्रवासखर्च लागत नाही. विमानकंपन्या ४,४०५ रुपये घेऊन परतीच्या प्रवासाचे तिकीट देत आहेत. अर्थातच इतकी रक्कम खर्च करू शकणारे ' जमले तर ठीकच, नाहीतर परदेश प्रवास झाला ' असे मानून कॅनडाला जात आहेत.

---

## संततिनियमनाबाबत अज्ञान व अनास्था

संततिनियमनाबाबतच्या सद्य:परिस्थितीविषयी इंडिअन स्टॅटिस्टिकल इन्स्टिटयूट ह्या संघटनेने केलेल्या नमुना पाहणीवरून देशात संततिनियमनाबद्दल अद्याप किती अनास्था व अज्ञान आहे ते स्पष्ट होत आहे. पाहणीसाठी जमविण्यात आलेल्या माहितीवरून असे दिसून आले की बऱ्याच जोडप्यांना अद्याप संततिनियमनाची सामाजिक आवश्यकता पटलेलीच नाही. शिवाय संततिनियमनाविषयी बहुतेक जोडप्यात एक सुप्त अशी अनास्थाही दिसून येते. त्यामुळे मुले होऊन देण्याची वृत्ती वाढीला लागते. त्यातही मुलगा होण्याची इच्छा अनिवार दिसून येते. १९७० मध्ये केलेल्या ह्या पाहणीत असे आढळून आले की ग्रामीण भागांत अवघ्या २३ टक्के पत्नींना संततिनियमनाच्या एखाद्या विशिष्ट पद्धतीचे ज्ञान असते. शहरात असे ज्ञान असणाऱ्यांचे प्रमाण ४३ टक्के आहे. ज्यांना संततिनियमनाविषयी कसलीच माहिती नसते, त्यांच्यापैकी ग्रामीण भागातील ७२ टक्के लोकांना व शहरी भागांतील ७६ टक्के लोकांना माहिती करून घेण्याची इच्छाही नसते. ग्रामीण भागातील ज्या पत्नींना संततिनियमनाच्या पद्धतींचे ज्ञान असते अशांपैकी ८२ टक्के लोक साधनांचा वापर करीत नाहीत. शहरात अशा पत्नींचे प्रमाण ७१ टक्के आहे. ग्रामीण अगर शहरी भागांतील ज्या सामाजिक वर्गाचा राहणीचा दर्जा उच्च आहे तेच काय ते फार मुले असण्याच्या विरुद्ध आहेत.

---

## निर्वासितांसाठी धाडलेले कपडे बाजारात !

बांगला देशांतील निर्वासितांसाठी परदेशांतून धाडण्यात आलेले अनेक प्रकारचे लोकरीचे कपडे श्रीनगरमधील रस्त्यावर उघडपणे विकले जात आहेत. त्यांत लोकरीचे शर्ट, कोट, ओव्हरकोट, पांघरुणे, इत्यादींचा समावेश आहे. हा सर्व माल विपुलतेने येत आहे. रस्त्यावर विक्री करणाराकडे चौकशी करता तो लुधिआना शहरांतील घाऊक व्यापाऱ्यांकडून मिळत असल्याचे समजले. मोठ्या प्रमाणावर येणाऱ्या ह्या मालासाठी शहरांत गुदामेच उघडण्यात आली आहेत. तेथून फेरीवाले माल घेतात. मालाच्या किमती स्वस्त असल्यामुळे लोकरीचा माल विकणाऱ्या नेहमीच्या व्यापारांचे खूप नुकसान होत आहे. आता त्यांनीही स्पर्धा करण्यास प्रारंभ केला आहे.

---

## रक्तांतरासाठी रक्तपुरवठा

शस्त्रक्रियेच्या वेळी, अपघातानंतर, आजारीपणात, रुग्णांना रक्तांतराच्या द्वारा ( ब्लड ट्रॅन्स्फ्यूजन ) बाहेरील रक्ताचा पुरवठा करावा लागतो. हे रक्त रक्तदान करणारांकडून विकत घ्यावे लागते. कारण स्वयंस्फूर्तीने, एक सामाजिक जबाबदारी म्हणून आपले रक्त देण्यास तयार होणारे लोक पुरेसे नसतात. रक्ताचे देणगीदार जेवढे अधिक मिळतील तेवढे रक्त सुलभतेने कमीत कमी किमतीला उपलब्ध होऊ शकेल आणि रुग्णांचे प्राण वाचतील. ब्लड बँकांना आज रक्त विकत देणारे बहुसंख्य पैशाचे गरजू तर असतातच, पण त्यात दारूबाजही असतात. रक्तातून मिळणारा प्लॅस्माही पुरेसा उपलब्ध होत नाही. अमेरिकेत दरसाल ८५ लक्ष पाइंट रक्त स्वेच्छेने रक्तदान करणारांकडून मिळते; म्हणजे ८५% रक्त मोफत मिळते. कित्येक अमेरिकन फर्म्स दक्षिण अमेरिका, पश्चिम आफ्रिका, इत्यादी ठिकाणच्या अत्यंत दरिद्री शेतुतांकडून त्यांचे रक्त प्लॅस्मासाठी विकत घेऊन अमेरिकेत पाठवतात. जपान, ग्रेटब्रिटन, फ्रान्स, डेन्मार्क ह्या देशांची रक्ताची गरज मोफत रक्त देणाऱ्यांच्या देणगीतून भागते. भारतात असे देणगीदार अधिकाधिक पुढे येत आहेत, पण अद्याप स्वतःच्या रक्ताची विक्री करणारांच्या रक्तावरच रक्त घेणाऱ्यांना अवलंबून रहावे लागत आहे.

---

## शेतकीचे पदवीधर जरूरीपेक्षा जास्त होऊ लागले

चवथ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस ( १९७३-७४ ) शेतकीचे १६,००० पदवीधर बेकार असलेले आढळतील, असा इंडियन कौन्सिल ऑफ अॅग्रिकल्चरल रिसर्चने इशारा दिला आहे. ह्यापुढे शेती शिक्षणाच्या संस्था वाढविण्यात येऊ नयेत, त्यात घ्यावयाच्या विद्यार्थ्यांची संख्याही वाढविली जाऊ नये, अशी शिफारस कौन्सिलने सरकारला केली आहे. आता ह्यापुढे संख्येपेक्षा गुणवत्ता, प्रत्यक्ष कामाचा अनुभव, नव्या गरजांनुसार अभ्यासक्रम, ह्यांचीच खरी आवश्यकता आहे.

---

**सिलिंडरमधील गॅस संपत आला का ?** — सैपाकासाठी वापरण्यात येणारा गॅस एकदम संपून गृहिणींची गैरसोय होते ती टाळण्यासाठी अहमदाबादचे इंजिनिअर श्री. आर. ए. पारिख ह्यांनी एक उपाय शोधून काढला आहे; त्याला गुजरात चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीने पुरस्कार दिला आहे. एका वाटोळ्या तबकडीत एक रासायनिक द्रव असते. त्या द्रवावर एक तरते पात्र असते. त्या पात्रावर गॅस सिलेंडर ठेवण्याचा असतो. तरत्या पात्राचे तिन्ही बाजूस संरक्षक सळया असतात. एक इंडिकेटर गॅस किती शिल्लक आहे ते दर्शवितो. इंडिकेटरवरील ठराविक रेषा गॅस आणखी फक्त ४ तासच पुरेल असे सांगते. ह्या उपकरणाचा सिलिंडरमधील गॅसशी संबंध येत नसल्यामुळे त्यात धोका मुळीच नाही. ४० रु. किंमतीला ते लवकरच मिळू लागेल.





सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

♣

— आमची वैशिष्ट्ये —

- हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
- टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

♣

फोन नं. ३-३०३३०] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

## परदेशातील संयुक्त मालकीच्या हिंदी कंपन्या

भारत सरकारने परदेशात संयुक्त मालकीच्या कंपन्या स्थापन करण्याचा निर्णय घेऊन अशा कंपन्यांसाठी ३५ देशांना मंजुरी दिली. अशा कंपन्यांपैकी ३३ कंपन्यांनी प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ केला आहे आणि ५३ कंपन्या उभारण्याचे काम चालू आहे. त्यांपकी बहुतेक कंपन्या उभारणीच्या निरनिराळ्या अवस्थांत आहेत. बऱ्याचशा कंपन्या आग्नेय आशिया आणि आफ्रिका ह्या भागात आहेत. तथापि ह्याचा अर्थ भारताच्या मानाने मागासलेल्या देशांतच त्या आहेत असा नाही. काही कंपन्या ब्रिटन, पश्चिम जर्मनी, कॅनडा ह्यांसारख्या प्रगत देशातही आहेत. ह्या कंपन्यात गुंतविण्यात येणारे हिंदी भांडवल भांडवली माल आणि यंत्रसामग्री ह्यांच्या रूपात गुंतविण्यात येते. रोख भांडवल गुंतविण्यात येत नाही. मात्र कंपन्यांच्या उभारणीसाठी करावा लागणारा प्राथमिक खर्च रोख पैसे पाठवून करण्यात येतो. ह्या ८६ कंपन्यात गुंतविण्यात आलेले शेअर भांडवल १५·८६ कोटी रुपये इतके आहे. कंपन्यांना गुंतविलेल्या भांडवलामुळे हिंदला विविध मार्गांनी प्राप्ती होते. त्यांत भांडवलावर होणारा नफा, तांत्रिक ज्ञानाच्या पुरवठ्याबद्दल मिळणारी फी, रॉयल्टी, कारभारविषयक मेहनताना, इत्यादींचा समावेश आहे. ह्या सर्वापोटी भारताला १·१४ कोटी रुपये मिळतात. भांडवलाच्या हिशेबापोटी मिळणाऱ्या परदेशीय चलनाखेरीज प्रत्यक्ष रोखीच्या रूपाने करण्यात येणाऱ्या निर्यातीपोटी भारताला ८३·५२ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाचे उत्पन्न मिळाले आहे. ह्या कंपन्या विविध प्रकारच्या उत्पादक कंपन्या आहेत.

---

## जम्मू येथे विलासी मोटेलचे उद्घाटन

हिंदच्या टूरीस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनने जम्मू येथे एक विलासी मोटेल स्थापन केले आहे. 'मोटेल' म्हणजे मोटारीने प्रवास करणारांच्या सर्व गरजा भागविणारे होटेलच म्हणावयास हरकत नाही. अशा प्रकारची तात्पुरती निवासस्थाने अमेरिकेत अनेक ठिकाणी आहेत. भारतात मात्र अशी सोय प्रथमच करण्यात आली आहे. 'मोटेल'च्या उभारणीसाठी ३५ लाख रुपये खर्च आला आहे. मोटेलची इमारत एका टेकडीवर बांधण्यात आली असून तीवरून जम्मू शहर व तावी नदी ह्यांचे विहंगम दृश्य दिसते. १०० प्रवाशांची उतरण्याची सोय त्यात करण्यात आली आहे. सुखद हवामान राखणारे एक सभागृहही त्यात आहे. ५ व्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अवधीत दरसाल निदान ८ लाख परदेशी प्रवासी भारतात येतील असा अंदाज आहे.

---

## अर्थशास्त्रज्ञ डॉ. बी. आर. आंबेडकर

वरील विषयावर "अर्था"चे संपादक, श्री. श्री. वा. काळे ह्यांचे नभोवाणीच्या पुणे केंद्रावरून रविवार, दि. २४ सप्टेंबर रोजी रात्री ९–१५ वाजता भाषण होईल.

## पगार तसे ज्ञान देणारा शिक्षक

मध्यप्रदेशातील एका भूगोलाच्या शिक्षकाच्या ज्ञानदानाची कहाणी संबंधित विद्यार्थी-पुढाऱ्याने जाहीर केली आहे. ह्या शिक्षकाने गंगेसंबंधी माहिती देताना असे सांगितले की गंगा नदी अमरकंटक येथे उगम पावते आणि मध्यप्रदेशात वाहते. वास्तविक ही माहिती नर्मदा नदीची आहे आणि शिक्षकाला ठाऊकही होते. मग त्याने अशी चुकीची माहिती विद्यार्थ्यांना का दिली? चुकीची माहिती दिल्याबद्दल त्याला विचारण्यात आले. तेव्हां तो म्हणाला "काय हरकत आहे? मला दरमहा फक्त १५० रुपये पगार मिळतो. ४०० रुपये पगार मिळाला तर गंगा हिमालयात उगम पावेल व उत्तर भारतामधून वाहू लागेल. तोपर्यंत गंगेचा प्रवाह मध्यप्रदेशातूनच वाहात राहील."

---

## आत्मघातांची मानसशास्त्रीय चिकित्सा

मध्यवर्ती गृहखात्याच्या संशोधन विभागाने जमविलेल्या माहितीप्रमाणे १९६९ साली ४३,६३३ लोकांनी आत्मघात करून आपली जीवितयात्रा संपविली. १९६८ सालाशी तुलना करता आत्मघातात ७·२ टक्क्यांनी वाढ झालेली दिसते. काळाच्या दृष्टीने दर १२ मिनिटांनी एक आत्महत्या घडत होती. लखनौ येथील किंग जॉर्ज मेडिकल कॉलेजमधील प्राध्यापक डॉ. सेठी ह्यांनी आत्मघाताच्या कारणांची चिकित्सा करताना काही कारणे अशी सांगितली: आवाक्याच्या बाहेर असणाऱ्या अपेक्षा व नंतर त्यांचा भंग, अपयशामुळे स्वतःचाच तीव्र द्वेष करण्याची वृत्ती, शिक्षेची भीती, घरातील शिस्तीचे अत्यंत कडक असे वातावरण. शिवाय, आत्मघात करणारांच्या मनात प्रेमाला वंचित झाल्याची व आपण कोणाला नको असल्याची भावनाही घर करून राहिलेली असते.

---

## सैनिकांना संरक्षण कार्यातच व्यग्र ठेवावे

पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्र विभागापुढे बोलताना ले. ज. बेवूर म्हणाले की गेल्या डिसेंबरमध्ये पाकिस्तानशी झालेल्या युद्धात पाकिस्तानचा पराभव होण्याचे कारण त्या देशाच्या सैन्याला रोजच्या व्यवस्था–कारभारात काम पाहण्यास सांगितले हे आहे. वास्तविक पाकिस्तानी लष्कर हे चांगले लढवय्ये होते. पण शांतताकालात त्याला मुलकी जीवनातील दैनंदिन कारभाराकडे लक्ष द्यावे लागले. त्यामुळे त्याची युद्धकुशलता कमी झालेली होती. आजही त्याची कार्यक्षमता ह्याच कारणामुळे घसरत चालली आहे. अशी जबाबदारी लष्करावर टाकल्याने देशाचे रक्षण करण्याची त्याची पात्रता कमी होत जाते.

---

**जनता विमान वाहतूक**— मध्यरात्र ते सकाळी सहा ह्या वेळात कमी दराने विमान वाहतूक करण्याची शक्यता इंडियन एअर लाइन्सच्या विचाराधीन आहे.

### विद्यार्थ्यांसाठी अपघात विमायोजना

मुंबईमधील डॉन बॉस्को हायस्कूलने आपल्या विद्यार्थ्यांसाठी विमा योजना आखली आहे. त्यामुळे विमेदार विद्यार्थ्यांच्या मृत्यूची किंवा पंगुत्वाची भरपाई केली जाते. वैयक्तिक अपघात विमा योजनेखाली, वर्षाला १२ रु. हप्ता दिला म्हणजे विद्यार्थ्याला तो शाळेत असताना, शाळेत येताना, शाळेतून घरी जाताना, शाळेच्या सहलीला गेलेला असताना अपघात झाला तर क्लेम निर्माण होतो. मृत्यु, पूर्ण पंगुत्व, अवयव पूर्णपणे निकामी होणे किंवा दोन्ही डोळे जाणे, झाला ५,००० रु. नुकसानभरपाई मिळते. एक अवयव निकामी झाला किंवा एक डोळा गेला, तर २,५०० रु. मिळतात. तात्पुरते पूर्ण पंगुत्व असेल तर दर आठवड्यास ५० रु. प्रमाणे १०४ आठवडे रक्कम मिळते. १,६०० प्राथमिक विद्यार्थ्यांपैकी १,५०० विद्यार्थ्यांच्या पालकांनी विमा योजनेस मान्यता दिली आहे. ओरिएंटल फायर अँड जनरल इन्शुअरन्स कंपनीतर्फे ही योजना सादर करण्यात आलेली आहे.

---

### इंडोनेशिआला साखरकारखान्यांची यंत्रसामग्री

इंडोनेशिआतील साखरकारखान्यांची यंत्रसामग्री जुनी झालेली आहे. त्या जीर्ण यंत्रसामग्रीच्या जागी नवी बसविण्यासाठी इंडोनेशिआ प्रयत्न करीत आहे. त्या देशाला ह्या कामासाठी १० कोटी डॉलर्स अथवा ७५ कोटी रुपयांच्या यंत्रसामग्रीची गरज आहे. भारतात साखरकारखान्यांची यंत्रसामग्री बनविणारे कारखाने आता प्रगत झाले आहेत. अशा कारखान्यांनी एकत्र येऊन इंडोनेशिआची मागणी पुरी करण्याचा विचार चालविला आहे. इतर देशांच्या मानाने भारत ही यंत्रसामग्री काहीशी स्वस्त देऊ शकेल असा विश्वास कारखानदारांना वाटत आहे. भारतात तयार होणाऱ्या यंत्रसामग्रीसाठी फक्त १० टक्क्यांपर्यंतचे काही सुटे भाग अद्याप परदेशातून आयात करावे लागतात.

---

### तेलातील भेसळीमुळे विकलांगता

कलकत्ता विभागात गेल्या काही दिवसात मोहरीचे भेसळ केलेले तेल खाण्यासाठी वापरल्यामुळे २०० लोकांना पक्षघाताचा विकार झाला आहे. रोगाची लक्षणे दिसू लागण्यापूर्वी प्रथम स्नायू दुखू लागतात व चालणे अवघड वाटू लागते. नंतर हाताची हालचाल करणेही अवघड होते. प्लॅस्टिकच्या धंद्यात वापरण्यात येणारा एक रंगहीन द्रव पदार्थ तेलात मिसळण्यात आल्याचे आढळून आले आहे.

---

### हिंदच्या चहाचे रशिया मोठे गिऱ्हाइक

हिंदमधील चहा घेणाऱ्या देशात रशिआचा क्रमांक पहिला लागतो. त्यानंतर ब्रिटन व अर्जेंटायना ह्यांचे क्रमांक लागतात. ह्या वर्षाच्या जानेवारी ते जून ह्या अवधीत रशिआने भारताकडून १५,९२२ टन चहा आयात केला. ब्रिटनने ८,४०३ टन आणि अर्जेंटायनाने ७,३७५ टन चहा आयात केला.

### नुकसानभरपाई प्राप्तीकरास पात्र ठरली

एखाद्या कंपनीला सरकारकडून नुकसान भरपाई मिळाल्यास ती रक्कम प्राप्तीकरास पात्र होते की नाही ह्याविषयी सुप्रीम कोर्टाने असा निकाल दिला आहे की अशी रक्कम प्राप्तीकरास पात्र आहे. प्रस्तुत प्रकरणी दिलेल्या निकालपत्रात सुप्रीम कोर्टाच्या बेंचने असाही अभिप्राय व्यक्त केला आहे की कंपनीला नुकसानभरपाई दाखल मिळालेली रक्कम भांडवलापोटी मिळालेली नसून उत्पन्न पोटी मिळालेली आहे. अर्थातच ती करपात्र आहे. पुणे येथील कमिशनर ऑफ इन्कमटॅक्सतर्फे मुंबई हायकोर्टाच्या निकालावर सुप्रीम कोर्टात अपील करण्यात आले होते. संबंधित कंपनीकडील काही लाकडाच्या झोपड्या भारत सरकारने भारत संरक्षण कायद्याप्रमाणे आपल्या ताब्यात घेतल्या होत्या. धान्याचा साठा करण्यासाठी सरकारला त्या हव्या होत्या. त्यांची गरज संपल्यावर सरकारने कंपनीला १ लाख, ७० हजार रुपये रक्कम नुकसानभरपाई म्हणून दिली. त्यापैकी १ लाख, ५ हजार इतकी रक्कम करपात्र आहे असे धरून प्राप्तीकर अधिकाऱ्याने कारवाई केली. त्यावर कंपनीने प्रकरण मुंबई हायकोर्टात गुदरले. हायकोर्टाने असा निकाल दिला की कंपनीला मिळालेली नुकसान भरपाईची रक्कम भांडवली स्वरूपाची आहे. कारण नफा मिळविण्याची कंपनीची जी यंत्रणा होती तिला सरकारच्या कृत्याने धोका पोचला होता; आणि म्हणून ती रक्कम करास पात्र नाही. मुंबई हायकोर्टाचा हा निकाल सुप्रीम कोर्टाने फिरवला व प्राप्तीकर खात्याचे म्हणणे ग्राह्य धरले.

---

**प्लॅस्टिकच्या पिशव्यांतून दूध विकणार** — हिमाचल प्रदेशातील मंडी येथे ४५ लक्ष रु. खर्चून एक डेअरी उभारण्यात येत आहे. डेअरीचे दूध अर्ध्या आणि एक कि. ग्रॅमच्या पॉलिथिन पिशव्यांतून विकले जाईल. प्रत्येक पिशवीला फक्त ३ पैसे पडतील. ह्या पिशव्या दूध घेणारा नंतर फेकून देईल. डेअरीची यंत्रसामग्री प. जर्मनीकडून देणगीदाखल मिळाली आहे.

**जगातील मोठ्या ३०० बँकांत एकच हिंदी बँक**— जगातील सर्वात मोठ्या (जिंदगीच्या दृष्टीने) ३०० बँकांत एकमेव हिंदी बँक आहे आणि ती म्हणजे स्टेट बँक ऑफ इंडिया. बँक ऑफ अमेरिका, सॅन फ्रॅन्सिस्को (३३४१ कोटी डॉलर्स), फर्स्ट नॅशनल सिटी कॉर्पोरेशन, न्यूयॉर्क (२८७४ कोटी डॉलर्स), चेस मॅनहॅटन कॉर्पोरेशन, न्यूयॉर्क (२३९५ कोटी डॉलर्स) ह्यांनी पहिले तीन अनुक्रम पटकाविलेले आहेत. स्टेट बँकेची, तिच्या उपबँकांसकट, जिंदगी २,४२६ कोटी रुपये आहे.

**पोलाद उत्पादकांत हिंदुस्तान स्टीलचे स्थान**—पोलादाचे उत्पादन करणाऱ्या जागतिक कंपन्यात हिंदुस्तान स्टीलचा अनुक्रम २९ वा लागतो, तर टाटा आयर्नचा ४४ वा लागतो. त्यांची वार्षिक उत्पादनक्षमता अनुक्रमे ३०,०७,००० आणि १६,९५,००० मेट्रिक टन आहे. निपॉन स्टील कॉर्पोरेशन, टोकियो, जपान, हिचा अनुक्रम पहिला असून तिची उत्पादनक्षमता ३,३६,४०,००० मेट्रिक टन आहे.

### पत्रांच्या सॉर्टिंगच्या सौकर्यासाठी कोड नंबर लिहा

दिल्ली, मुंबई, मद्रास आणि कलकत्ता येथून निघणाऱ्या पत्रांवर 'पिन बिफोर यू पोस्ट' असा शिक्का मारण्यात येऊ लागला आहे. नव्याने छापण्यात येणाऱ्या इनलँड लेटरवर आणि पोस्टकार्डावर सहा चौकोन ओळीने छापण्यात येतील, त्यात पोस्टल इंडेक्स नंबर लिहावयाचा आहे. त्यामुळे पत्रे लिहिलेल्या पत्त्यावर लवकर, अचुक पोचतील. १५ ऑगस्ट रोजी ही 'पिन' पद्धत सुरू झाली, ती देशव्यापी होण्यास दोन वर्षे लागतील. सॉर्टरला ह्यापुढे सबंध पत्ता वाचावा लागणार नाही; गावांची नावे लक्षात ठेवण्याचे त्याला कारण नाही. वेगवेगळ्या लिप्या आणि भाषा त्याला अवगत असण्याचे प्रयोजन नाही.

एखाद्याने महाराष्ट्रातील चार अष्टी गावांपैकी एका गावातील कुणालाही पत्र लिहिले, तामीळमध्ये पत्ता लिहिला आणि कलकत्ता येथे ते पोस्टात टाकले, तरी ते अचुक पोचेल—त्याने पत्त्यावर कोड नंबर लिहिला असेल तर.

बीड जिल्ह्यातील अष्टीचा नंबर ४१४२०३ आहे, सोलापूर जिल्ह्यातील अष्टीचा नंबर ४१३२०३ आहे, वर्धा जिल्ह्यातील अष्टीचा नंबर ४४२२०२ आहे आणि परभणी जिल्ह्यातील अष्टीचा नंबर ४३१५०७ आहे. कोड नंबरमुळे कोणते अष्टी गाव हवे, ते चटकन समजू शकते.

भारताची विभागणी आठ विभागांत केली असून प्रत्येक विभागाला एकेक आकडा दिलेला आहे, तो प्रथम लिहावयाचा आहे. दिल्ली, हरियाणा, पंजाब, हिमाचलप्रदेश, जम्मु–काश्मीर ह्यांचा आकडा १ आहे, उत्तर प्रदेशाचा २ आहे, राजस्तान आणि गुजरातचा ३ आहे, महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश ह्यांचा ४ आहे. म्हैसूर आणि आंध्र ह्यांचा समावेश ५ ह्या आकड्यांत आहे तर तामीळनाडू आणि केरळ ६ आकड्यांत समाविष्ट आहेत. पश्चिम बंगाल, आसाम, ओरिसा, अरुणाचल, मेघालय, नागालँड, मिझोराम, मणिपूर, त्रिपुरा ह्यांना ७ आकडा दिलेला आहे. आसामला ८ हा आकडा मिळाला आहे.

पाच आकड्यांतील दुसरा आकडा उप–विभाग दर्शवितो, तिसरा आकडा त्याचा उपविभाग दाखवितो, शेवटचे तीन आकडे पोस्टल डिलिव्हरी केंद्रापर्यंत नेऊन पोचवितात.

भारतातील १·११ लक्ष पोस्ट ऑफिसांपैकी १४,०३२ शहरी पोस्ट ऑफिसांना पिन आकडे देण्याचे काम पुरे झाले आहे. ग्रामीण भागांतील पोस्ट ऑफिसांना नंबर देण्याचे काम लवकरच हाती घेण्यात येईल. ह्या आठ आकड्यांत ८ लक्ष पोस्ट ऑफिसांचा समावेश करता येईल.

अशा तऱ्हेच्या पिन आकड्यांची व्यवस्था जगात २० देशांमध्ये चालू आहे. प. जर्मनीने ती प्रथम १९६१ मध्ये सुरू केली.

पिन डिरेक्टरी लवकरच १ रुपया किंमतीस मिळू लागेल. सर्व सरकारी खात्यांना पिन नंबर लिहिण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मोठ्या प्रमाणावर टपाल पाठविणाऱ्या फर्मसनाही तसे कळविण्यात आले आहे.

"अर्थ"च्या पत्त्यावर पत्र पाठवावयाचे असेल, तर कोड-नंबर असा लिहा :—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | १ | १ | ० | ० | ४ |

### चलनवाढीचे दुष्परिणाम दिसू लागले
#### सरकारला रिझर्व्ह बँकेच्या सूचना

"सरकारने तुटीची अर्थव्यवस्था मर्यादेत राखणे आवश्यक आहे; कराची वसुली वाढविली पाहिजे आणि सरकारी कारखान्यांची कार्यक्षमता वाढवून त्यांच्या हिशेबात वाढावे निर्माण झाले पाहिजेत. सप्टेंबर, १९७१ ते मार्च, १९७२ ह्या काळात किमती फारशा वाढल्या नाहीत पण त्यानंतर मात्र अपेक्षेपेक्षा महागाई वाढली असून ती चिंताजनक आहे. पूर्वीच्याच दराने धान्य खरेदी केल्यामुळे नवीन रब्बी पीक बाजारात आल्यावरही किमती उतरू शकल्या नाहीत. उत्पादनात घट झाली की किमती तात्काळ वाढतात, पण उत्पादन सुधारले तरी त्याचा फायदा ग्राहकांपर्यंत पोचतच नाही. वेतनातील वाढ उत्पादनवाढीशी सुसंगत असायला हवी, वेतनातील वाढीमुळे बचत वाढायला हवी आणि उत्पन्नाची फेरवाटणी घडून यायला हवी. उत्पादनवाढ आणि कार्यक्षमतेमध्ये स्पर्धा ही यशाला आवश्यक आहेत. चलनवाढ रोखून धरण्याचे आणि जनतेजवळील पैसा खेचून घेण्यासाठी आर्थिक संस्थांनी सोयी वाढविण्याचे महत्त्व ओळखले पाहिजे. किमती स्थिर राखायच्या असतील तर पतपुरवठा करताना अधिक कसोशीचे धोरण अवलंबिले पाहिजे. महागाईमुळे औद्योगिक कलह वाढले आहेत आणि त्याचा उत्पादनवाढीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. पब्लिक सेक्टरचे उत्पन्न वाढले आहे, पण खर्च त्याहीपेक्षा वाढला आहे; तुटीच्या अर्थव्यवस्थेचा अवलंबही त्यामुळे वाढला आहे."

---

**बिगर-तिकीट प्रवाशांमुळे भुर्दंड**—बिगर-तिकीट प्रवाशांमुळे रेल्वेजचे दरसाल सुमारे २० ते २२ कोटी रु. नुकसान होते. चोऱ्यांमुळे १५ कोटी रु. चे नुकसान होते आणि अशा गुन्हेगारांच्या प्रतिबंधासाठी नेमलेल्या नोकरवर्गास १५ कोटी रु. पगार द्यावा लागतो.

**पब्लिक सेक्टर बँकांचा नफा**—पब्लिक सेक्टरमधील २२ व्यापारी बँकांचा (स्टेट बँक, तिच्या सात उपबँका आणि १४ राष्ट्रीयीकृत बँका) नफा १९७१ साली १०·१ कोटी रु. होता, तो १९७२ मध्ये १२·८ कोटी रु. झाला. राष्ट्रीयीकृत बँकांनी सर्व खर्च भागवून आणि नेहमीच्या तरतुदी करून भारत सरकारकडे नफ्यापैकी ४·४ कोटी रु. वर्ग केले; १९७१ मध्ये ४·२ कोटी रु. वर्ग केले होते.

## लॉर्ड, लेडी आणि बटलर

'ओल्ड बेली' या इंग्लंडमधील फौजदारी कोर्टात मॉरिस ऑरिगन या ३३ वर्षांच्या एका आकर्षक व्यक्तिमत्त्वाच्या बटलरवर एकूण सुमारे ३ लक्ष रुपयांचे तीन बनावट चेक वठविल्याबद्दल खटला चालू होता. सर फ्रॅन्सिस हेन्री पीक या ५६ वर्षे वयाच्या एका लॉर्डचा तो बटलर आणि प्रसंगानुसार मोटार ड्रायव्हर होता. लेडी कॅरोलिन पीक ही ३७ वर्षांची 'तरुणी' होती आणि मॉरिसला यामुळे बटलरपेक्षाही अधिक फलदायी सेवा करण्याची संधी मिळाली.

सर फ्रॅन्सिस वरचेवर आपल्या जमीनजुमल्याची व्यवस्था पाहण्यासाठी बाहेरगावी जात असे. त्यामुळे घरात लेडी पीकला फक्त बटलरची सोबत असायची. लेडी पीक त्याला 'शर्ट विकत घ्यायला' वरचेवर पैसे देऊ लागली. एके दिवशी मॉरिस मालकाला विमानतळावर पोचवून घरी आला आणि स्वैंपाकघरात आपल्या कामाला लागला. लेडी पीक तेथे येऊन 'जवळीक' करू लागली. त्यानंतरच्या सहा महिन्यात त्यांचे सहा वेळा 'मीलन'ही झाले. नंतर पीक कुटुंबाने स्पेनमध्ये जाऊन राहावयाचे ठरविले. बटलरला वाटले की आपणही त्यांचेबरोबर जाणार. पण त्यांच्या नव्या घरी त्याच्यासाठी राहण्याची स्वतंत्र व्यवस्था नव्हती.


लेडी पीकने बटलरला तीन सही केलेले कोरे चेक दिले आणि त्यावर एकूण ३ लक्ष रुपयांपेक्षा जास्त आकडा घालू नको, असे सांगितले. "हे पैसे तुला मी फुकट देत नाही; त्याचा मोबदला तुला स्पेनमध्ये येऊन मला द्यावा लागेल" असे तिने स्पष्ट केले.


कोर्टातील खटल्याचे वेळी लेडी पीकने बटलरचे सर्व म्हणणे नाकबूल केले. 'घरखर्चासाठी बँकेतून पैसे आणण्यासाठी मी हे चेक दिले होते' असे तिने सांगितले. परंतु तिच्या उलटतपासणीत ती डळमळली. 'तिची साक्ष विश्वासार्ह नाही' असे कोर्टाने ज्यूरीला सांगितले. ज्यूरीने बटलरला निर्दोषी ठरविले, इतकेच नव्हे तर त्याला तुरुंगात ८ महिने काढावे लागले, याबद्दल कोर्टाने दिलगिरी व्यक्त केली. "ब्रिटिश सरदार-उमरावांना माझा अखेरचा नमस्कार" असे म्हणत बटलर कोर्टातून विजयी मुद्रेने बाहेर पडला.

---

## जपानवर अमेरिकेचे आर्थिक दडपण

अमेरिका व जपान यांच्यामधील व्यापारी संबंध सुधारणे जपानला भाग पडत आहे. त्याचे कारण असे आहे, की जपान व अमेरिका यांच्यातील व्यापारी देवघेवीत जपानला अनुकूल अशी तफावत आहे. म्हणजे जपानची अमेरिकेला होणारी निर्यात उलट बाजूने होणाऱ्या निर्यातीपेक्षा बरीच अधिक आहे. या वर्षी जपानची अमेरिकेला होणारी निर्यात ४०० कोटी डॉलर्सनी अधिक असण्याचा संभव आहे. उभय देशांतील व्यापारातील ही मोठी तफावत अंशत: तरी कमी व्हावी म्हणून जपानने निदान १०० कोटी डॉलर्सचा माल आयात करावा असा आग्रह अमेरिकेने धरला होता. डॉलर्सची घसरण थांबविण्याचा हा उपाय कितपत यशस्वी ठरेल ते सांगता येत नाही.

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और कार्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड
र विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.
फोन: कार्यालय: २५३१७१ कारखाना: १७६१०१

BANK TO BANK...

**THE BELGAUM BANK LIMITED**

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* ; 659-60, Raviwar Peth, BELGAUM

Invest in our " Family Benefit Deposit Scheme " and earn Monthly Interest as a Pension - Enquire at any of our Branches - Bombay Office at Mandvi, Bombay - 9.

OUR MOTTO IS SERVICE AND WE REALLY SERVE.

S. Y. KAMAT, *General Manager.*

K. B. KIRTIKAR, *Chairman.*

**ओगले**

**प्रभाकर कंदील**


- अंधाऱ्या रात्री,
- वादळी वाऱ्यात,
- ओबड-धोबड रस्त्यावर,
- खवळलेल्या दर्यावर


मार्गदर्शक व विश्वसनीय.

तयार करणार

ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड

ओगलेवाडी ( जि. सातारा )





इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.

कारखानदार—

**न्यू विजय इंडस्ट्रीज लि.**

विश्रामबाग—सांगली ( महाराष्ट्र )

फोन : २३१

तार : IVwpijoay

हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाविलास' ८२१ शिवाजीनगर ( डो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ६ )